Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# महिलांचे राजकारणातील योगदान

**प्रा. दिनेश साहेबराव खंडारे,** राज्यशास्त्र विभाग प्रमुख, खा. भ. सेवा मंडळ संचलित कला, वाणिज्य व बी.सी.ए. महिला महाविद्यालय, धुळे

**प्रस्तावना**

देश स्वातंत्र्य झाल्यानंतर शिक्षणाचा प्रचार, प्रसार व जागृती झाली व यामुळे आज भारतीय स्त्री सर्वच क्षेत्रामध्ये स्थान मिळविल्याचे दिसून येते. भारतातील स्त्रिया ज्याप्रमाणे सर्वच क्षेत्रात भरारी घेत आहेत त्याचप्रमाणे त्यांचे प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात योगदान असल्याचे निदर्शनास येत आहेत. चूल आणि मूल ऐवढेच स्त्रियांचे क्षेत्र राहीलेले नसून त्या आज राजकारणात, समाजकारण तथा आर्थिक क्षेत्रात येवून आपली प्रगती तसेच देशाच्या प्रगतीला हातभार लावतांना दिसत आहेत. सध्या भारतीय विकासातील नेमकं स्थान काय असेल, याचा वेध घेतांना असे लक्षात आले की, मागील काही दशके स्त्रियांना कुटूंबात दर्जा व स्थान देण्यास खर्ची पडलेले दिसून येतो परंतु विसाव्या शतकाच्या सुरूवातीला महात्मा ज्योतिराव फुले, महर्षि कर्वे, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी स्त्री सुधारणा व स्त्री उन्नतीसाठी अथक प्रयत्न केलेले आहेत. त्यांच्या प्रयत्नातून स्त्रियांना आत्मबळ प्रकट करण्याची ईच्छाशक्ती प्राप्त होऊन कर्तुत्व सिध्द करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यामुळे आज भारतीय स्त्रीयांची विसाव्या शतकात कुटूंबातील आणि पर्यायियाने समाजातील स्थान उंचावले. त्यामुळे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कृषिवर आधारित असलेल्या ग्रामिण समाजाला सक्षम बनविण्याचे मोठे आव्हान होते. म. गांधी यांनी ग्रामविकासावर विषेश भर दिला होता. महिला, समाज आणि राष्ट्राच्या विकासातील एक महत्वपूर्ण अंग आहे. तरीसुध्दा आज महिला उपेक्षित जीवन जगत आहेत.

भारतीय महिला विकासाच्या प्रक्रियेपासून खूप दूर आहेत. भारतीय राज्य घटनेमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिलेले आहे. भारत सरकारने 1991 मध्ये 63 व्या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण लागू केले. ग्रामीण भागातील दुर्बल व उपेक्षित महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्यासाठी हे एक क्रांतीकारी पाऊल ठरले. ग्रामीण भागातील महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी दारिद्रय रेषेखालील कुटूंबाचे उत्पन्न वाढवून त्यांचा विकास करण्यासाठी महिलांच्या सक्रिय सहभागातून गावाचा विकास घडवून आणण्यासाठी देशात तसेच महाराष्ट्रात महिला बचत गट निर्माण झालेले आहेत. एक स्त्री म्हणून तिच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण, पितृसत्ताक कुटूंब असल्यामुळे तिला मिळालेले दुय्यम स्थान, कुटूंबाचा वारसदार म्हणून मुलांबद्दल सहानुभूती आणि मुलीचा तिरस्कार करण्याची वृत्ती दिवसेंदिवस वाढत चाचली आहे. स्त्रीला मातृत्वाची जबाबदारी, सासरचे वर्चस्व, पतीचे अकाली निधन, पती-पत्नीच्या वयात असलेला फरक, हुंडा यासारख्या बांबीमुळे स्त्रीयांच्या समस्येत नेहमीच वाढतांना दिसून येतात. भारतीय समाजात प्रत्येक स्त्रीचे दुःख दूसऱ्या स्त्रीपेक्षा वेगवेगळे आहे, कारण स्त्रीयांच्या जीवनात दुःख, निराषा, मनस्ताप, तिरस्कार, बलात्कार, आत्महत्या सारख्या ज्या उपेक्षित बाजू निर्माण झालेल्या आहेत, त्या जात, धर्म, पंथ, गरिब, मध्यम, श्रीमंत आदि वर्गात दिसून येतात. या सर्व दृष्टीने विचार केल्यास आजही स्त्री व पुरुष यांच्यात स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान राहिलेले दिसून येते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

कोणत्याही देशाची प्रगती व अदोगती हे त्या देशातील महिलांच्या स्थितीवर अवलंबून असते. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान स्व. जवाहरलाल नेहरू म्हटले होते की, भारताची प्रगती महिलांच्या स्थितीवरून ठरविली गेली पाहिजे. तसेच विचारवंत प्लेटो यांनी असे म्हटले आहे की, ज्या समाजामध्ये महिलांना सार्वजनिक कार्य करण्यापासून वंचीत ठेवले जाते तो समाज कधीही आदर्श व विकसीत होणार नाही. भारताच्या इतिहासामध्ये स्त्रियांचे स्थान हे आदर, सन्मानयुक्त आहे. भारताला स्वातंत्र्याची जी सूवर्ण संधी मिळाली, त्यात देखिल स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे. महिलांनी आपल्या कर्तृत्वाच्या माध्यमातून देशाला सुसंस्कृत करण्याचे कार्य केले आहे. त्याचप्रमाणे देशाला विकासाच्या सुवर्ण पाहाटेकडे नेण्याचे विधायक कार्य सुध्दा त्यांनी केलेले दिसून येते.

भारतीय समाज आणि राजकरणासाठी एकोणाविसावे शतक हे विभाजन रेखा म्हणून सिध्द झाले. धर्म आणि समाज सुधारणा आंदोलने झाली. ब्राम्होसमाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृश्ण मिषन इत्यादी संस्था आणि संघटनांनी भारतीय समाजात सुरू केलेल्या स्त्रि पुरुष विषमतेला आव्हान देवून विषमता दूर करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. यावेळी स्त्रियांच्या हिताच्या दृष्टीने सामाजिक कायदे निर्माण करण्याकरिता संघर्ष करण्यात आला.

भारतीय समाजव्यवस्थेत सर्वच क्षेत्रात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते व त्यामुळे आजपर्यंत त्या वंचीत, सत्तावंचित व प्रतिष्ठा वंचित राहिलेल्या आहेत. महिला विविध क्षेत्रात प्रवेश करतांना दिसत आहेत, परंतू हे समर्पक नाही. काही क्षेत्रात हे प्रमाण नगण्य, अल्प आहे महिलांना लोकसंख्येच्या प्रमाणात समान हिस्सा सर्वच क्षेत्रात मिळणे आवष्यक आहे. स्त्रियांची बुध्दीमत्ता, कार्यक्षमता व गुणवत्ता यांचा उपयोग न केल्याने या संपूर्ण क्षमतेपासून समाज वंचित राहातो. संपूर्ण समाजाचे नुकसान होते. स्त्रियांचे सक्षमीकरण करणे म्हणजे कुटुंबाचे, समाजाचे व देशाचे सक्षमीकरण होत असते. आपल्या पारंपारिक प्रवृत्तीला, विचारांना स्त्रियांनी पुरुषांची कामे करणे व पुरुषांनी स्त्रियांची कामे करणे पटतच नाही. मुळातच विशिष्ट कामे ही स्त्रीयाचीच व विशिष्ट कामे ही पुरूशांचीच ही कामाची विभागणी समाजाच्या पारंपारिक व सनातनी मानसिकतेवर आधारलेली आहे, आज भारतीय स्त्रीची परिस्थीती व तिच्या समस्या याबद्दल वेगळा विचार करण्याची गरज आहे. सर्व जगात आत्मबलाचा साक्षात्कार होत असलेली स्त्री, समाजात आपले योग्य स्थान मिळवण्यासाठी धडपडत आहे, ही धडपड केवळ उच्चस्तरीय महिलांमध्येच दिसून येते असे नाही तर समाजाच्या सर्व स्तरात थोड्याफार फरकाने दिसून येते.

भारत हा खेडयाचा देश असून भारतीय संस्कृतीचे दर्शन खेडे आणि ग्रामीन मध्ये बघायला मिळते. भारताच्या प्राचीन संस्कृतीचा इतिहास पाहीला तर पंचायत राज आणि तिची परंपरा भारतीय संस्कृतीत रूजलेली आहे, कारण भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारतीय संविधानात स्वातंत्र्य आणि न्यायाला महत्व देत असतांना लोकांच्या सहभागाला महत्व देण्यात आले. त्यात स्त्रिया आणि पुरुष असा भेदभाव न करता त्यांना अधिकाराच्या बाबतीत समानता देण्यात आली. कारण आपल्या भारत देशात लोकसंख्येचा अर्धा हिस्सा महिलांचा असून देशाचा विकास महिलांच्या समान भागीदारीशिवाय होऊ शकत नाही, महिला आणि पुरुषांमध्ये समानतेला व्यावहारीक रूप प्राप्त करून देण्यासाठी स्त्रियांची राजकीय संख्या वाढली पाहीजे. हयाकरीता 1993 मध्ये भारतीय संविधानाच्या 73 वी घटना दुरुसती करून स्त्रियांच्या संर्वागीन राजकीय विकासाकरीता पंचायत राज व्यवस्था स्विकारण्यात आली आणि स्त्रियांना राजकारणात भाग घेण्याची संधी प्राप्त झाली. पंचायत राज व्यवस्थेतील 33 टक्के आरक्षणामुळे स्त्रियांमध्ये राजकीय


Copyright © | JET Network, All Rights Reserved

जागृती होउन स्त्रिया ग्रामपंचायत पासून तर लोकसभा निवडणूका पर्यंत सर्वच स्तरावर राजकारणात भाग घेवून त्या त्या क्षेत्रातील मासन उत्कृष्टपणे चालवित आहेत. कारण कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा तेव्हाच निश्चित आणि स्थिर होत असतो की जो देश आपल्या देषातील नागरिकांचा (स्त्रियांचा) जीवनस्तर उंचावण्यासाठी कल्याणकारी राज्यात स्त्रि आणि पुरुष यांना समान अधिकार देवून समता प्रस्थापित करते आज तर कोणत्याही देषात राज्य आणि देशाच्या प्रगतीचा मापदंड हा त्या राज्याने स्त्रियांना किती मुलभूत आधिकार दिले व ते यषस्वीपणे अंमलात आणून स्त्रियांचा सर्वांगीण विकास किती घडवून आणला यावरून ठरत असते.

**2024 मध्ये महाराष्ट्रातील लोकसभेवर निवडून गेलेल्या महिला खासदार**

सुप्रिया सुडे, रक्षा खडसे, स्मिता वाघ, प्राणिती शिंदे, शोभा बछाव, वर्षा गायकवाड, प्रतिभा धांनोरकर अशा सात महिला खासदार देशाच्या राजकरणात काम पाहत आहेत.

**2024 मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आलेल्या महिला आमदार**

श्वेता महाले, मेघना बोर्डीकार, देवयानी फरांडे, सीमा हिरय, मंदा म्हात्रे, मनीषा चौधरी, विद्या ठाकूर, माधुरी मिसळ, मोनिका राजाळे, नमिता मुदंडा, श्रीजया चव्हाण, सुलभा गायकवाड, स्नेहा पंडित, अनुराधा चव्हाण, मंजुळा गावित, संजना जाधव, सुलभा खोदके, सरोज आहीरे, सना मलिक, अदिती ताटकरे, ज्योती गायकवाड अशा २१ महिला आमदार महाराष्ट्र राज्याच्या राजकरणात काम पाहत आहेत.

**समारोप**

भारतीय महिलांमध्ये राजकीय जाणीव जागृती आणि लोकशाही शासन व्यवस्थेच्या माध्यमातून सक्षमीकरण करण्यासाठी राज्यघटनेतील कायद्याची अंमलबजावणी कठोर स्वरूपात पाहिजे, तसेच कायद्याच्या आधारावर स्त्री आणि पुरुष यांच्यात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय समानता प्रस्थापित करून स्त्री आणि पुरुष असा भेदभाव नष्ट झाला पाहिजे. स्त्रियांसाठी उच्च शिक्षणाच्या सोयीसुविधा, स्वयंरोजगार मार्गदर्शन, मेळावे या कार्यक्रमाचे आयोजन केले पाहिजे. त्यामुळे स्त्रियांमध्ये राजकीय जागरूकता निर्माण होईल तसेच राजकरणात प्रत्यक्ष सहभाग घेवून राजकारणातील सत्ता प्राप्त करणाऱ्या स्त्रियांकडे समाज व पुरुषाचा पाहण्याचा दृष्टीकोण परिवर्तन झाले पाहीजे, स्त्रियांचे नोकरी व सार्वजनिक ठिकाणी लैंगिक शोषण थांबविण्याची गरज आहे. तेव्हाच स्त्रियांच्या राजकारणात आणि समाजकारणातील सहभाग हा स्थिर राहून स्त्रिया सक्रियपणे राजकारणात भाग घेवून देश, राज्य, जिल्हा व गाव पातळीवर शासन यशस्वीपणे सांभाळू शकतील.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. प्रा. व्हि. एच. भटकर, प्रा. निलेष निंबाळकर, प्रा. डॉ. प्रिया बोचे, ग्रामीण विकासाचा मार्ग पंचायती राज, प्रशांत पब्लिकेशन, जानेवारी 2013
2. स्वप्निल सारस्वत, डॉ. निषांत सिह, समाज राजनीती और महिलाएं दशा और दिशा,
3. डॉ. निशांत सिह, भारतीय महिलाएं एक सामाजिक अध्ययन
4. कुंभार नागोराव (संपादक) मानवी हक्क, स्नेहा ऑफसेट, लातूर
5. इंटरनेट - विकिपीडिया


Copyright © | JET Network, All Rights Reserved